350-A

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ १३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई

महत्वाचे

मजीप्रा/सस/तांशा-१/ ११९८ दिनांक २३/३/२०००

## परिपत्रक क्र. ३८

विषय :- ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी आवश्यक असलेले वेगवेगळ्या प्रकारचे पाअिप्सची खरेदी न करणे बाबत

संदर्भ :- या कार्यालयाचे दिनांक. १२/१/२०००चे पत्र क्रMJP/MS/TS-I/508/132

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे गेल्या काही महिन्यापासून निधीची चणचण भासत असल्याने उपलब्ध निधीचा उपयोग काटेकोरपणे आणि अगदी आवश्यक अशा कामांसाठीच करणे शक्य व्हावे म्हणून संदर्भीय पत्रान्वये ग्रामीण तसेच नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी लागणा-या वेगवेगळ्या प्रकारच्या पाअिप्सची खरेदी मध्यवर्ती कार्यालयाकडून परवानगी प्राप्त झाल्याशिवाय करु नये असे क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

शिवाय वेगवेगळ्या पाअिप्स पुरवठा करणा-या कंपन्या/ संस्था यांनाही त्यानी ठेकेदारांनी दिलेल्या पुरवठा आदेशानुसार तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिलेल्या पुरवठा आदेशानुसार पाअिप्सचा पुरवठा करण्यापूर्वी मध्यवर्ती कार्यालयाकडून निधीच्या अुपलब्धतेबाबत खात्री करुन घ्यावी असेही कळविण्यात आले आहे.

तथापी वरील आदेश निर्गमित करण्यापूर्वी ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी संबंधित ठेकेदारांनी पाअिप्स पुरविले आहेत असे सर्व पाअिप्स, आता निधीची अुपलब्धता नसल्याने अंथरता येणार नाहीत असे दिसते.

अशा परिस्थितीत ज्या योजना ( नागरी/ ग्रामीण ) पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत परंतु थोडे फार पाअिप्स अुपलब्ध नसल्याने त्या कार्यान्वित करणे शक्य होत नाही, अशा योजनांसाठी लागणारे पाअिप्स कसे अुपलब्ध करुन द्यायचे ते प्राधिकरणाच्या विचाराधीन होते.

या संदर्भात सदस्य सचिव (प्रशासन व अर्थ ) यांचेशी चर्चा करुन असा निर्णय घेण्यात आला आहे की ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे पाअिप्स पुढील कामांसाठी निधी नसल्यामुळे नुसते पडून राहणार आहेत त्यांचा उपयोग अशा गरजू नागरी/ग्रामीण योजनांच्यासाठी करावा.

वर्धा पाणी पुरवठा योजनेसाठी तसेच.कोल्हापूर व इचलकरंजी.पाणी पुरवठा योजनेसाठी लागणा-या पाफ्सिचे पुरवठा आदेश देण्याबाबतचे प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयांकडून प्राप्त झाले असता त्यांचे बाबत वरील प्रमाणे कार्यवाही करण्याच्या सुचना क्षेत्रीय अधिका-यांना याआधीच दिल्या आहेत.

या परिपत्रकाव्दारे सर्व क्षेत्रिय अधिका-यांना सूचित करण्यात येते की त्यांच्या कार्यक्षेत्रात वर अुल्लेख केल्याप्रमाणे काही योजना कार्यान्वित करण्यासाठी पाअिपांची गरज आहे अशी परिस्थती अुदभवली तर संबंधित निविदे अंतर्गत पाअिपांची खरेदी न करता (ग्रामीण पाणी पुरवठा योजनेबाबत ) त्यांच्या कार्यक्षेत्रातील अथवा आसपासच्या इतर कोणत्याही मंडळ कार्यालयाच्या क्षेत्रातील कोणत्याही नागरी अथवा ग्रामीण पाणी पुरवठा योजनेसाठी प्राप्त झालेले पाअिप्स वापरुन योजना कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करावा.

नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी देखील वरील प्रमाणेच अितर कोणत्याही नागरी अथवा ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी प्राप्त झालेले पाअिप्स वापरण्यात यावेत जेणे करुन पाअिप खरेदीवर खर्च करण्याचा प्रश्न उदभवणार नाही.

या परिपत्रकाची सर्वांनी नोंद घ्यावी.

(सही) 27/3/00.
( राजेंद्र सगणे )
सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत,
मा.मंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री, नगरविकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई

प्रत
सचिव, पा.पु.व स्व.वि.मत्रालय मुंबई
सदस्य सचिव (आ + प्र) म.जी.प्रा मुंबई

प्रत,
वि.का.अ.व मुख्य अभियंता म.जी.प्रा.नवी मुंबई
मुख्य अभियंता, म.जी.प्रा. (सर्व)
अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.मंडळ, (सर्व )
अधीक्षक अभियंता (मुख्यालय) /गुप/म.नि.सं.स./सं.व.प्र.केंद्र/समन्वय/जागतिक बँक पुणे/ठाणे
कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.बांधकाम विभाग (सर्व )

प्रत,
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई

M. J. P.
ISSUED
27/3/2000
MUMBAI-21